नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०८/२०२५ ( शुक्रवार )**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत सावनेर शहरातील अदयावत सी.सी.टी.व्ही निगराणी प्रकल्पाचे मा.ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन

आज दिनांक १५/०८/२०२५ रोजी सावनेर सेफ सिटी प्रोजेक्ट अंतर्गत सावनेर शहरात कृत्रिम बुध्दीमत्ता आणि चेहरे ओळखण्याची प्रणाली असलेले अदयावत सी.सी.टी.व्ही निगराणी प्रकल्पाचे मा.ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सदर सी.सी.टी.व्ही निगराणी प्रकल्पाला सुरक्षा कवच असे नाव दिले आहे. एकुण ९१ अत्याधुनिक सी.सी.टी.व्ही कॅमरे लावण्यात आले आहे. या कॅमेऱ्यांमध्ये Facial Recognition System आणि Automatic Number Plate Recognition System (ANPR) आहे. सदर अदयावत सी.सी.टी.व्ही प्रणाली मध्ये वारंवार गुन्हे करणारे गुन्हेगारांचा डेटा संग्रहीत केल्या जाईल त्यामुळे गुन्हेगारांवर नियंत्रण मिळवता येईल. या प्रकल्पाचे माध्यमातून सावनेर शहरातील १५ डार्क क्राईम स्पॉट कव्हर करण्यात आले. त्याचबरोबर शहरातील मुख्य चौक ज्यामध्ये गडकरी चौक, गांधी चौक, बस स्टॅन्ड, बाजार चौक, होळी चौक, शिवाजी चौक तसेच या शहरातून बाहेर जाणारे व येणारे सर्व एन्ट्री एक्झिट मार्गावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे माध्यमातून निगराणी ठेवली जाणार आहे. सदर कार्यक्रमांमध्ये मा. ना. श्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री महसूल महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा, मा. श्री श्यामकुमार बर्वे, लोकसभा सदस्य, रामटेक क्षेत्र, मा. श्री डॉ आशिष देशमुख विधानसभा सदस्य सावनेर क्षेत्र, मा. श्री. संदीप पाटील विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिषेत्र, मा श्री हर्ष पोद्दार पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, या सर्वांनी आपल्या मनोगत त्यामध्ये ही सीसीटीव्ही

यंत्रणा जनतेमध्ये सुरक्षेची भावना निर्माण करेल असा विश्वास व्यक्त केला त्याचबरोबर असामाजिक तत्त्वावर, गुंडगिरी प्रवृत्तीच्या व्यक्तीवर वचक निर्माण करेल. या प्रकल्पाच्या माध्यामातुन सावनेर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील. त्याचबरोबर नवीन कायद्याच्या माध्यमातून डिजिटल पुराव्याचे महत्व प्राप्त झाले आहे. त्यासाठी सावनेर शहराची सीसीटीव्ही यंत्रणा दोषसिद्धी वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे असे प्रतिपादन केले आहे.

सी.सी.टी.व्ही निगराणी प्रकल्पाचे उद्घाटन समारंभाला मा.ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा यांच्या सह मा.श्री. श्यामकुमार बर्वे, लोकसभा सदस्य, रामटेक लोकसभा क्षेत्र, मा.डॉ आशिष देशमुख, विधानसभा सदस्य, सावनेर – कळमेश्वर क्षेत्र, मा.श्री संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परीक्षेत्र , मा.श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्रीमती वृष्टी जैन, सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड, श्री सागर खर्डे, सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर आणि पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील, प्रभारी अधिकारी, सावनेर पोलीस स्टेशन, पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, उमरेड तसेच इतर शासकीय अधिकारी, पत्रकार व नागरिक असे ४०० ते ५०० उपस्थीती होती.

सदर समारंभात मा. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीमे अंतर्गत पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण जिल्हा महाराष्ट्रातून दुसऱ्या क्रमांकाने निवड झाल्याबाबत आल्याने, नागपूर महसुल क्षेत्रातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालयामधुन उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांची प्रथम क्रमांकाने निवड झाल्याबाबत तसेच नागपूर महसुल क्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशन मधुन उमरेड पोलीस स्टेशनची प्रथम क्रमांकाने निवड झाल्याबाबत मा.ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा यांनी नागपुर ग्रामीण पोलीसांना प्रशस्तीपत्र देवुन त्यांचे कौतुक केले.


उद्घाटन समारंभ






INTEGRATED COMMAND & CONTROL CENTRE SAONER




## नागपूर ग्रामीण पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदार यांना सन्मानपत्र प्रदान

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्रदिनी विभागिय आयुक्त कार्यालय, नागपुर येथे उल्लेखनीय कामगिरीसाठी नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण (तात्कालीन उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर) यांना १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम अंतर्गत नागपूर महसुल क्षेत्रातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालयामधुन उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांची प्रथम क्रमांकाने निवड झाल्याबाबत तसेच श्रीमती वृष्टी जैन, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या सह पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, उमरेड यांना नागपूर महसुल क्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशन मधुन उमरेड पोलीस स्टेशनची प्रथम क्रमांकाने निवड झाल्याबाबत प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले. श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री रमेश नत्थुजी ताजने, नेम. पोलीस

स्टेशन कुही यांना त्यांनी पोलीस खात्यात दिलेल्या गुणवत्तापूर्वक सेवेसाठी माननीय राष्ट्रपती, भारत सरकार, यांच्या कडून त्यांना गुणवत्तापूर्व सेवा पदक जाहीर झाल्याने त्यांना प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले आणि चालक पोलीस हवालदार श्री राजेश नत्थुजी सोनटक्के ,ब.नं ३२५ नेम. मोटर परिवहन विभाग, नागपुर ग्रामीण यांना विशेष सेवा पदक जाहीर झाल्याने प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रमाला मा.ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा यांच्या सह मा. श्री. श्यामकुमार बर्वे, लोकसभा सदस्य, रामटेक लोकसभा क्षेत्र, मा. श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी, विभागीय आयुक्त नागपूर, मा. डॉ. रविंद्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त,नागपुर शहर, मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र, मा. डॉ. विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी , नागपुर , मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, श्रीमती वृष्टी जैन, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड, यांचे सह इतर वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.







## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## १ कोटी ३३ लाख ५४ हजार ७२० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## आरोपी अटक, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक १४/०८/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी अंबिका हॉटेल कळमेश्वर ते सावनेर, बायपास रोडवर नाकाबंदी केली असता अशोक लेलन्ड कंपनीचे १० चाकी कन्टेनर वाहन क्र. आर. जे. ११ जी. डी. ३१३१ मिळुन आला. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आला. चालक **आरोपी नामे** जाहिद अयुब रा. बिजोपूर तह.गोची, जि. फरीदाबाद, राज्य हरीयाणा हा मिळुन आल्याने आरोपी चालकाला अधिक विचारपुस केली असता सदर वाहन हे मे. व्यंकटेश्वर लॉजिस्टीक, रा. राजीव नगर फैज २ बेगमपुर नवि दिल्ली च्या मालकीची असल्याची माहीती प्राप्त झाली. तसेच आरोपीने सदर सुंगधीत पानमसाला इंदोर येथील गोल्डन ॲरोन मॅन्युफॅक्चरींग कंपनी येथुन आणल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष सुगंधित पान मसाला (प्रतिबंधीत अन्नपदार्थ) एकुण ९०,४५६ किलोग्रॅम किंमती १,०८,५४,७२०/— रूपये आणि वाहन क्र. आर.जे. ११ जी. डी. ३१३१ किंमती २५,००,०००/— रूपये असा एकुण १,३३,५४,७२० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी वाहन चालक, वाहन मालक आणि इंदोर येथील गोल्डन ॲरोन मॅन्युफॅक्चरींग कंपनी मालक यांच्या विरूद्ध पोस्टे सावनेर येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद चालक आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**



## अवैधरित्या विनापरवाना  विक्रीसाठी गॅस सिलेंडर साठा करणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद ,स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक १४/०८/२०२५ रोजी  स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्‌दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनिय  माहीती मिळाली की, चिंचभवन ,१४ मैल  येथे  राहणारा  सुनील उर्फ सोन्या दशरथ बोरकर  हा त्याचे राहते घर व  परिसरात अवैध्यरित्या गॅस सिलेंडर विक्रीचे उद्देशाने बाळगून काळा बाजार करीत आहे.  अशी माहीती प्राप्त होताच नमुद पथक चिंचभवन, १४ मैल येथे घटनास्थळी पोहचले. पंचासमक्ष आरोपी यास विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव **सुनील उर्फ सोन्या दशरथ बोरकर, वय ४६ वर्षे , रा. चिंचभवन ,१४ मैल, ता. कळमेश्वर, जि.नागपूर** असे सांगितले. पोलीसांनी नमुद आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपीचे घरात विविध

कंपन्यांचे भरलेले आणि रिकामे सिलेंडर मिळुन आले. त्याला परवाना बाबत विचारणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नव्हती. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) १७ नग एच.पी. कंपनी सिलबंद गॅस भरलेले सिलेंडर, २) ३४ नग भारत गॅस कंपनीचे सिलबंद गॅस भरलेले सिलेंडर, ३) ०३ नग भारत कंपनीचे रिकामे सिलेंडर, ४) ०१ नग एच.पी कंपनीचे रिकामे कमर्शियल सिलेंडर. ५) ०१ जुना वापरता Vivo कंपनी मोबाईल असा एकुण १,७१,५००/— रूपयांचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

**नमुद आरोपीविरूध्द पोस्टे कळमेश्वर येथे** जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३,७ सहकलम २८७ भा.न्या.सं अन्वये **गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशीदारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १४/०८/२०२५ स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथक पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी स्टेट बॅक च्या मागे वार्ड क्रं.५ हनुमान नगर कन्हान येथे नाकाबंदी केली असता एक मोपेड दुचाकी क्रं.एम.एच ४० बी. झेड ६९८४ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता डिक्कीमध्ये देशीदारू मिळुन आली. **आरोपी नामे विश्वनाथ उर्फ ददु गणेश खडसे, वय २४ वर्ष, रा. एम.जी नगर, तारसा रोड, कन्हान हा अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारू संत्रा २४ नीपा २) मोपेड दुचाकी क्रं.एम.एच ४० बी.झेड ६९८४ असा एकुण किंमती ६१,९२०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १४/०८/२०२५ उमरेड पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा बायपास चौक, उमरेड येथे नाकाबंदी केली असता एक मोपेड दुचाकी क्रं.एम.एच ४० सी यु ६५६४ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता विदेशी दारू मिळुन आली. आरोपी नामे **नितीन मारोतराव सुर्यवंशी, वय ३९ वर्ष, रा.वाघमारे, लेआउट परसोडी उमरेड**, हा अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) रॉयल स्टॅग, ईम्पेरीयल ब्ल्यु च्या बॉटल किंमती १४८० /— रूपये आणि २) मोपेड दुचाकी क्रं.एम.एच ४० सी यु ६५६४ किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण किंमती ४१,४८०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे स्वतंत्रदिनानिमित्य अमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत करण्यात आली जनजागृती

**दिनांक १५/०८/२०२५ रोजी स्वतंत्रदिनानिमित्याने अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात खालील प्रमाणे अंमली पदार्थ सेवनाच्या हानीकारक परिणामांबद्दल जगजागृती करून विशेष कार्यक्रम राबविण्यात आले आहे.**

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतील सनराईज इंग्लीश मिडीयम स्कुल येथे श्री. दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग नागपुर यांचे उपस्थितीत अंमली पदार्थ विरोधी अभियाना अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री. दिपक अग्रवाल यांनी शाळेतील विदयार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम, शिक्षणात होणारे नुकसान यावर मार्गदर्शन केले. आणि त्यांच्या शंका दूर करण्यात आल्या. **तसेच** टाकळघाट मस्जिद येथे सहा .पोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांनी तेथे उपस्थितीत

मुस्लीम बांधवाना अंमली पदार्थाचे सेवन व होणारे दुष्परिणाम याबाबत माहीती देवुन जनजागृती करण्यात आली.





**पोलीस स्टेशन बोरी :—** पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन बोरी यांनी बुटीबोरी हद्दीतील पतंजली फूड्स कंपनी, बुटीबोरी येथे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियांनाअंतर्गत कार्यशाळा घेण्यात आली कार्यशाळेत कंपनीमध्ये ट्रक ड्रायव्हर, सिक्युरिटी गार्ड यांना अंमली पदार्थ व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, होणारे नुकसान यावर मार्गदर्शन करण्यात आले.




**पोलीस स्टेशन बेला :—** सहा .पोलीस निरीक्षक श्री चेतनसिंग चव्हाण , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन बेला यांनी बेला बस स्टॉप येथे उपस्थित नागरिकांना अंमली पदार्थाचे सेवन व होणारे दुष्परिणाम याबाबत माहीती देवुन जनजागृती करण्यात आली.



**पोलीस स्टेशन मौदा** :— पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा आणि मौदा येथील अधिकारी आणि अंमलदार यांनी मौदा हद्दीतील ऑक्सफोर्ड इंग्लीश स्कुल, मौदा आणि शिर्डी साई विदयालय, येथील विदयार्थ्यांना अंमली पदार्थ सेवनाच्या हानीकारक परिणामांबाबत मार्गदर्शन मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली होती तसेच त्यांची "अंमली पदार्थ सेवानाचे दुष्परीणाम" या विषयावर निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली होती. आज रोजी **उत्कुष्ट निबंध लिहणाऱ्या विदयार्थ्यांना बक्षीस वितरीत केले**. तसेच परमात्मा एक आश्रम ,मौदा येथील कार्यक्रमात आयोजीत कार्यक्रमामध्ये उपस्थित नागरिकांना मौदा पोलीसांनी अंमली पदार्थाचे सेवन व होणारे दुष्परिणाम याबाबत माहीती देवुन जनजागृती करण्यात आली.






पोलीस स्टेशन रामटेक :— **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत गडमंदीर येथे** श्री रमेश बरकते,उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग रामटेक यांचे उपस्थितीत अंमली पदार्थ विरोधी

अभियाना अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री. रमेश बरकते यांच्यासह पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक यांनी तेथे उपस्थित नागरिकांना अंमली पदार्थ तसेस ईतर व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम यावर मार्गदर्शन करून नागरिकांमध्ये जनजागृती केली.



**पोलीस स्टेशन कन्हान** **:–** कन्हान पोलीसांनी अम्मा दरगाह गाडे घाट येथे उपस्थित नागरिकांना अंमली पदार्थाचे सेवनाने होणारे दुष्परिणाम याबाबत माहीती देवुन जनजागृती करण्यात आली.

**पोलीस स्टेशन काटोल :–** श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी , काटोल उपविभाग आणि पोलीस निरीक्षक श्री रंजीत सिरसाठ , प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांच्या उपस्थितीतीत जामा मस्जीद, पेठ बुधवार येथे मुस्लीम बांधवांना अंमली पदार्थाचे सेवनाने होणारे दुष्परिणाम याबाबत माहीती देवुन जनजागृती करण्यात आली.तसेच अनुसया माता देवस्थान, पारडसिंगा येथे उपस्थित नागरिकांना अंमली पदार्थ सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता व्हिडिओ दाखवण्यात आले अंमली पदार्थाचे सेवनाने होणारे दुष्परिणाम याबाबत माहीती देवुन जनजागृती करण्यात आली.




**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत लाखोटीया भुताडा स्कुल येथे श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी , काटोल उपविभाग यांचे उपस्थितीत अंमली पदार्थ विरोधी अभियाना अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री बापु रोहोम यांनी शाळेतील विदयार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम, शिक्षणात होणारे नुकसान यावर मार्गदर्शन केले.



## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १४/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १५/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.




रसवंती



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने